# भुयारी मेट्रो ३ : स्थानकांच्या कामांना वेग

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या देशांतील पहिल्या वहिल्या भुयारी मेट्रो-३ चे काम वेगाने सुरू आहे. मेट्रोची स्थानके चकाचक करण्यावर भर दिला जात आहे. मेट्रोच्या स्थानकांपैकी विद्यानगरी या स्थानकाचे काम वेगाने सुरू आहे. एमआयडीसी स्थानकाच्या ग्रेनाईटचे काम सुरू झाले आहे.

मेट्रोच्या स्थानकांपैकी विद्यानगरी या स्थानकाचे काम वेगाने सुरू असल्याचा दावा कॉर्पोरेशनकडून करण्यात आला आहे. हे स्थानक बीकेसीपासून जवळ आहे. शिवाय हे स्थानक व्यावसायिक आणि रहिवासी केंद्र जोडणार आहे.